बुधवार, २६ जानेवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक १९०
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

# शेतकऱ्यांच्या जमिनींचे ज़बरदस्तीने संपादन केल्यास तीव्र आंदोलन करू!

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचा राज्य सरकारला इशारा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय विरार–अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी निताळे, वावंजे, नितळस या गावांमधील जमिनीची मोजणी करू नये, अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलचे विभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे. जबरदस्तीने जमीन संपादित केल्यास शासनाला संघर्षाला सामोरे जावे लागेल, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला आहे. **(पान २ वर..)**

## वर्ध्यात अपघातामध्ये सात मित्र जागीच ठार

**वर्धा :** वर्ध्यात एका कारच्या भीषण अपघातात सात तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. देवळी मार्गावरील सेलसुरा येथे रात्री हा अपघात झाला. या अपघातानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शोक व्यक्त केला. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून सेलसुराजवळ झालेल्या अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

**राम प्रहर**

### गुरुवारचा अंक नाही

प्रजासत्ताक दिनानिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास बुधवारी सुटी असल्यामुळे गुरुवार (दि. २७)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी आणि हितचिंतकांनी नोंद घ्यावी. प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा! *–मुख्य संपादक*
















# सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केली तलाव बांधकामाची पाहाणी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

येथे सेक्टर १५मध्ये पनवेल महापालिकेच्या वतीने तलाव बांधण्याचे काम सुरू असून या कामाची पाहाणी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी करून आढावा घेतला, तसेच अधिकार्‍यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

पनवेल महापलिकेच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे सुरू आहेत. त्यानुसार खारघर सेक्टर १५ मध्ये तलावाचे बांधकाम सुरू आहे. या तलावाजवळ छट्पूजेसाठी आणि गणपती विर्सजनासाठी व्यवस्था होत आहे, तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि गार्डन सुरू करण्यात येणार आहे. या सुरू असलेल्या कामाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी केली. या वेळी स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर, प्रभाग समिती ‘अ’ सभापती संजना कदम, नगरसेवक निलेश बाविस्कर, भाजप नेते समीर कदम, मुकेश गर्द, बबिता मॅडम, बुथ अध्यक्ष विश्वनाथ एन. डी., मोहन भुजवडकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे मार्तंड सोनावणे, महापलिकेचे जाने साहेब आणि फोटरेज ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. या वेळी परेश ठाकूर यांनी तलावाचे काम वेगाने आणि दर्जेदार पद्धतीने होत असल्याचे सांगितले.

# आज खारघर येथे महारक्तदान शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका, दुर्गामाता फेरीवाला संस्था, खारघर डॉक्टर असोसिएशन व खारघर साऊथ इंडियन सेलच्या वतीने ‘महारक्तदान शिबिर’ आणि लसीकरण शिबिर बुधवारी (दि. २६ जानेवारी) होणार आहे. या शिबिराचे पनवेल महापालिकेचे नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या तयारीच्या कामाचा सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २५) आढावा घेतला.

खारघर सेक्टर १५ मधील सुवर्णगंगा ज्वेलर्स येथे सकाळी १० वाजता हे शिबिर होणार असून, १५ वर्षावरील मुलांचे लसीकरण मोठ्या प्रमाणात होणार आहे. या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन कोरोना काळात मृत्युमुखी पडलेल्या कोविड योद्धे व नागरिकांना श्रद्धांलजी देण्यात येणार आहे. या शिबिराच्या पूर्वतयारीच्या कामाचा सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आढावा घेतला आणि सूचना दिल्या, तसेच या वेळी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त उपस्थित लोकप्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी आणि स्वच्छता दूतांनी प्रतिज्ञा घेऊन लोकशाही मजबूत करण्याचा संकल्प घेतला. या वेळी स्थायी समिती सभापती अ‍ॅड. नरेश ठाकूर, निलेश बाविस्कर, प्रभाग समिती ‘अ’च्या सभापती संजना कदम, भाजप नेते समीर कदम, मुकेश गर्द, बुथ अध्यक्ष विश्वनाथ एन. डी., मोहन भुजवडकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे मार्तंड सोनावणे, बबिता मॅडम, महापालिकेचे अधिकारी जाने साहेब आदी उपस्थित होते.

## लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने जनजागृती अभियान



**उरण : बातमीदार**

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे आणि विमानतळ बाधित गावांना न्याय मिळावा यासाठी काम बंद आंदोलन केले. त्यासंदर्भात घणसोली, गोठीवली, जुहुगाव, वाशी, दापोली, ओवळा या गावांत लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने जनजागृती अभियान करण्यात आले.

यामध्ये गीतकार, संगीतकार, गायक तेजस पाटील, गायिका सपना पाटील, गायक समाधान फोफेरकर, ढोलकी वादक मिलिंद कडू, कीबोर्ड वादक रूपेश म्हात्रे या सर्वांनी गावागावांत जाऊन गाण्यांच्या माध्यमातून जनजागृती केली.



**गोवा : गोवा विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने ६-सिओलिम या विधानसभा मतदारसंघाबाबत गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, प्रभाकर बहिरा यांनी भेट घेऊन चर्चा केली.**




# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन निधीतून नेरे येथे रस्त्याचे काँक्रिटीकरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन निधीतून येथील नेरे ग्रामपंचायतीमधील नेरे पाडा ते स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येत आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २५) झाले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पनवेल पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, गोटीराम म्हात्रे, आंबो रोडपालकर, माया म्हात्रे, नाना म्हात्रे, दत्तात्रेय भगत, नंदलाल भगत, कान्हा म्हात्रे, योगेश रोडपालकर, अंकुश रोडपालकर, रवी शेळके, ज्ञानेश्वर म्हात्रे, रोहिदास भगत, रूपेश म्हात्रे, महेंद्र गायकर, शरद काकडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २६ जानेवारी २०२२ रोजी होणारे

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस
(वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. क्रीडा संकुल, एच.ओ.सी., पनवेल
- ३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ४. सिडको सामाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १५. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

### कोवॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. निमिषा हेल्थ सेंटर (पमपा), खारघर
- ४. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

### ग्रामीण लसीकरण

- वळवली रा.जि.प. शाळा
- पेंधर रा.जि.प. शाळा
- रोहिंजन रा.जि.प. शाळा
- तळोजे मजकूर रा.जि.प. शाळा
- मुर्बी रा.जि.प. शाळा
- कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- कोयनावेळे रा.जि.प. शाळा
- आसूडगाव रा.जि.प. शाळा
- पालेखुर्द रा.जि.प. शाळा
- जुईगाव रा.जि.प. शाळा

पान १ वरून

## शेतकर्‍यांच्या जमिनींचे जबरदस्तीने संपादन केल्यास तीव्र आंदोलन करू!

आमदार प्रशांत ठाकूर यांनी विभागीय अधिकार्‍यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी (एमएमसी) पनवेल तालुक्यातील निताळे, वावंजे, नितळस या गावांमधील शेतकर्‍यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे समजते, परंतु या प्रकल्पासाठी संपादित करावयाच्या जमिनीच्या मोबदल्यात किती रक्कम अथवा काय भाव निश्चित करण्यात आला आहे, याबाबत शेतकर्‍यांना अद्याप कळविण्यात आलेले नाही. जमीन संपादनाच्या प्रक्रियेनुसार मोजणीचे काम सुरू केले आहे. मोबदला निश्चित न करता शासनाकडून जबरदस्तीने होणारी मोजणी प्रक्रिया यामुळे शेतकर्‍यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होऊन असंतोष पसरला आहे. त्यामुळे शेतकर्‍यांनी जमीन मोजणी प्रक्रियेला विरोध दर्शविला आहे.

जमीन संपादनाचा मोबदला तसेच इतर गोष्टींसंदर्भात निर्णय घेतल्यानंतरच जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात यावी, असे न झाल्यास नाईलाजास्तव शेतकर्‍यांच्या न्याय्य हक्कासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला आहे.

शेतकर्‍यांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय विरार-अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉरसाठी (एमएमसी) निताळे, वावंजे, नितळस या गावांमधील संपादित करण्यात येणार्‍या जमिनींची मोजणी पूर्णपणे थांबवावी; अन्यथा शासनास संघर्षाला सामोरे जावे लागेल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदनातून अधोरेखित केले आहे.

## सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा



**खांदा कॉलनी : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगु काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले, तसेच या वेळी विविध स्पर्धांचे निकाल जाहीर झाले असून विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पुढाकाराने राष्ट्रीय मतदार दिवस कॉमर्स रिसोर्स सेंटरमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मीम्स कॉम्पिटीशन, निबंध स्पर्धा, तसेच स्लोगन आणि पोस्टर या ऑनलाईन आणि ऑफलाईन स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तसेच लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबंधित शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाला कोकण विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. संजय जगताप, तहसीलदार विजय तळेकर, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, उपायुक्त विठ्ठल डाके, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी सूर्यकांत परकाळ यांच्यासह सर्व स्वयंसेवक, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

**विजेत्या स्पर्धकांनी नावे**

*निबंध स्पर्धेत प्रथम अभिषेक पाटील, द्वितीय अनुष्का भोसले, तृतीय प्रिया चौधरी; मीम्स स्पर्धेत प्रथम जागृती सोनी, द्वितीय प्रणाम शेट्टी, तृतीय नेहा हेलगे; पोस्टर स्पर्धेत प्रथम ज्योती धायुडे, रोहित देशमुख, तृतीय ऋतुजा पाटील; स्लोगन स्पर्धेत प्रथम कीर्ती उलूडरोलू, द्वितीय गोकुळ पाल, तृतीय अरीफ साजीद.*

## बेकायदा सोन्याची वाहतूक; ३७ लाखांचे सोने जप्त

**महाड : प्रतिनिधी**

बेकायदा सोने जवळ बाळगून वाहतूक करणार्‍या चिपळूण येथील चालकासह पाच जणांना महाड तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३७ लाख ५२ हजार रुपये किमतीचे सोने जप्त केले आहे.

चिपळूण येथून बेकायदा सोने जवळ बाळगून वाहतूक केली जाणार असल्याची खबर महाड तालुका पोलिसांना मिळाल्यानंतर सोमवारी (दि. २४) गस्त घालून पहाटे ४ वाजता टोळ फाटा येथे नाकाबंदी केली. या दरम्यान झायलो गाडीतून प्रवास करणार्‍या चार जणांकडे ८९१.५४९ ग्रॅम सोने आढळून आले. बेकायदा सोन्याची वाहतूक करणार्‍या अशरफ फारूक शेख, समीर श्रीकांत भूनिया, गोपाळ बंकिम हजरा, राजकुमार सतीश मंडल आणि झायलो गाडीचा चालक हेमंत पवार यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## निवडक

### नवी मुंबईतून एक जण बेपत्ता



**कळंबोली :** येथील सेक्टर १० मध्ये राहणारे गिरीश मेनन २१ जानेवारी २०२२ रोजी तुर्भे येथील निशोटेक कंपनीतून बेपत्ता झाले आहेत. ते अद्याप घरी न आल्याने ते बेपत्ता झाल्याची तक्रार तुर्भे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. कळंबोलीत पत्नी व मुलीसह राहत असलेले गिरीश मेनन यांनी बेपत्ता झाले त्या दिवशी लाल शर्ट आणि निळी जीन्स घातली होती. त्यांच्याबाबत कोणाला काही माहिती असल्यास जवळच्या पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा अथवा ९८१९५०२३१७, ९०२९५७६९२३, ९७०२३११३४२, ८९७६१६३५०८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राजन पिल्लाई यांच्या वतीने करण्यात आले आहे. ही माहिती भाजप कळंबोली कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल यांनी दिली.

### ‘सीकेटी’त जि. प.च्या विभागीय परीक्षा

**नवी मुंबई :** कोकण विभागांतर्गत जिल्हा परिषदेच्या कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल सहाय्यक, संगणक या पदावरील कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ सहाय्यक पदावर २५ टक्के निवडीने भरण्याकरिता मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परीक्षा सन-२०२१ नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात होणार आहे. ९ फेब्रुवारी २०२२ रोजी होणाऱ्या या परीक्षेचे प्रवेशपत्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून ९ फेब्रुवारीपूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांनी त्या-त्या जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून स्वीकारावे. असे कोकण विभागाचे महसूल आयुक्त विलास पाटील यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### महिलेकडून दागिन्यांसह पैसे लंपास

**पनवेल :** करंजाडे वसाहतीत एका वृद्ध महिलेकडे असलेल्या पर्स व दोन पिशव्यांमध्ये असलेली रोख रक्कम, दागिने व मोबाइल फोन अज्ञात व्यक्तींनी लंपास केला आहे. माधवी नलावडे (वय ७०) या करंजाडे सेक्टर ३ येथून पायी घरी जात असताना त्यांना रस्त्यात थकवा आल्याने त्यांनी त्यांच्याकडील पर्स व दोन पिशव्या खाली ठेवून बसल्या. या वेळी त्यांच्या नकळत अज्ञात व्यक्तींनी त्या पिशव्यांमधील असलेले रोख रक्कम, दागिने व मोबाइल फोन व इतर कागदपत्रे असा मिळून जवळपास २५ हजारांचा ऐवज लंपास केला. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# एनएमएमटीमुळे रिक्षाव्यवसाय तोट्यात

■ नेरे येथून बसफेऱ्या कमी करण्याची चालकांची मागणी

■ भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी केली अधिकाऱ्यांशी चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेरे येथून एनएमएमटी बसेसच्या फेऱ्या कमी करण्यात याव्या, जेणेकरून येथील रिक्षाचालकांच्या व्यवसायावर परिणाम होणार नाही. या मागणीसंदर्भात भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी आसुडगाव येथील एनएमएमटी डेपोच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

नेरे येथून दोन एनएमएमटीच्या दोन बसेस सोडण्यात येतात. यामुळे येथील रिक्षाचालकांच्या व्यवसायावर परिणाम होतो, म्हणून येथून एकच एनएमएमटी बस सोडण्यात यावी, अशी मागणी रिक्षाचालकांच्या वतीने करण्यात आली आहे. या विषयासंदर्भात आसुडगाव येथील एनएमएमटी डेपोच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. या वेळी अधिकाऱ्यांनी वरिष्ठांपर्यंत ही मागणी पोहचवतो असे सांगत दोन दिवसांची मुदत मागितली आहे. त्यामुळे दोन दिवसांत निर्णय घेतला नाही, तर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष अरुणशेठ यांच्या समवेत येथील सर्व रिक्षाचालक पुढील कार्यवाही करतील, असे या वेळी एनएमएमटीच्या अधिकाऱ्यांना सांगण्यात आले.

या बैठकीला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, वंदे मातरम जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष रवी नाईक व रिक्षाचालक उपस्थित होते.



# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश

## सिद्धार्थ आणि ओमचे मान्यवरांकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएसईच्या विद्यार्थ्यांनी चकमदार कामगिरी करून भारतीय संघात उत्तुंग झेप घेतली आहे. सिद्धार्थ मिश्रा आणि ओम झावरे यांची बॉक्स लंगडी या खेळामध्ये भारतीय संघात राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे. या खेळाडूंचे आणि त्यांच्या पालकांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौंन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करुन पुढील यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

सिद्धार्थ अनंतकुमार मिश्रा आणि ओम संदीप झावरे या विद्यार्थ्यांनी पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत घवघवीत यश संपादीत केले होते. त्यात त्यांनी रायगड जिल्ह्याचे प्रतिनीधीत्व करत तृतीय क्रमांक पटकावला होता. या स्पर्धेतून त्यांची महाराष्ट्र संघासाठी निवड करण्यात आली होती. त्यातही त्यांनी महाराष्ट्राला द्वितीय क्रमांक मिळवून दिला होता. त्यांची ही कामगिरी पाहता त्यांची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करत त्यांना पुढील वाटाचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी नगरसेवक विजय चिपळेकर, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लीक स्कूलच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या अर्चना खाडे-चव्हाण, क्रीडा शिक्षक सूरज चव्हाण यांच्यासह पालक उपस्थित होते.

# क्रिकेट सामन्यांच्या देणगीतून सीसीटीव्ही

## फ्रेंड्स फॉरेवर ग्रुप विंधणेचा उपक्रम

**उरण : बातमीदार**

फ्रेंड्स फॉरेवर ग्रुप विंधणेतर्फे एकदिवसीय क्रिकेट सामान्यांचे आयोजन केले होते. या सामन्यांच्या देणगीमधून ४० हजार रकमेतून उरण तालुक्यातील एसटी स्टॅन्ड व हनुमान मंदिर, विंधणे येथे सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे सामाजिक काम फ्रेंड्स फॉरेवर ग्रुप विंधणे यांनी केले आहे.

प्रल्हाद पाटील, प्रदीप शेळके, कल्पेश पाटील, समाधान जोशी, संदेश पाटील, राजन लोखंडे, सीताराम थळी, सुरज पाटील, अमर पाटील, सुरज पाटील, अशोक शिंदे, आशिष पाटील, किरण पाटील, अक्षय पाटील आदी फ्रेंड्स फॉरेवर ग्रुप विंधणेचे पदाधिकारी सदस्यांनी यासाठी मेहनत घेतली. तुषार थळी यांनी मोफत इंटरनेट सेवा दिली आहे. क्रिकेट सामन्यांमधून मिळणाऱ्या पैशात काही संघटना मौजमजा करतात, दारू मटण चिकनची पार्टी करतात. बाहेर फिरायला जातात, मात्र याच मॅचमधून मिळणाऱ्या पैशाचा सदुपयोग करत फ्रेंड्स फॉरेवर ग्रुप विंधणे या ग्रुपने सर्वांसमोर एक नवीन व चांगला आदर्श ठेवला आहे. या उपक्रमाचे, या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त पनवेल मनपातर्फे विविध कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिकेच्या निवडणूक विभागाच्यावतीने मंगळवारी (दि. २५) राष्ट्रीय मतदार दिन निमित्ताने मतदार अधिकार, कर्तव्य व निवडणूक याविषयी जाणीव, जनजागृती निर्माण करण्यासाठी, तसेच लोकशाहीवर निष्ठा ठेवण्यासंबधीत प्रतिज्ञा शपथ घेण्याचा कार्यक्रम व नियमितपणे मतदानाचा हक्क बजावणाऱ्या युवा व ज्येष्ठ मतदारांचा सन्मान कार्यक्रम पालिका मुख्यालय, कामोठे, खारघर, कळंबोली, पनवेल येथे घेण्यात आला.

सीकेटी महाविद्यालय, दादासाहेब लिमये महाविद्यालय कळंबोली, नवीन पनवेल येथील एनएनएस विद्यार्थ्यांना राष्ट्रीय मतदार दिन निमित्ताने मार्गदर्शन व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कामोठे येथील प्रभाग कार्यालयाच्या ‘क’ च्यावतीने चेरोबा मंदिर येथे सभापती अरूणा भगत यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक कार्यकर्त्या रंजना सडोलीकर, गृह निर्माण संस्था प्रतिनिधी श्रुती किर्तने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी डॉ. किर्ती हंपे, रिक्षा वाला संघटनेचे प्रतिनिधी गोपीनाथ भगत, आरोग्य समन्व्यक प्रतिनिधी गोमेश म्हात्रे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे उपस्थित होते.

कळंबोली प्रभाग कार्यालय ‘ब’ राष्ट्रीय मतदान दिवसानिमित्त प्रभाग समिती कार्यालयात मतदार शपथ घेण्यात आली. तसेच बूथ निहाय नागरिकांना मतदानाचे महत्त्व सांगण्यात आले. त्याप्रसंगी सभापती प्रमिला पाटील, रवी पाटील, प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, आरोग्य निरीक्षक, सर्व सफाई कर्मचारी उपस्थित होते. खारघर प्रभाग कार्यालय ‘अ’च्या वतीने प्रत्येक चौकामध्ये सफाई कर्मचाऱ्याच्या वतीने शपथ घेण्यात आली. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, सभापती संजना कदम, यांच्या उपस्थितीत मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली.

पनवेल प्रभाग कार्यालय ‘ड’मध्ये सर्व कर्मचाऱ्यांनी मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली येथे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्ताने ऑनलाइन व ऑफलाइन पध्दतीने वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे बक्षिस वितरण उपायुक्त विठ्ठल डाके, प्राचार्य सुधाकर लघू पचांग, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



# कामोठ्यातील गतिरोधकांवर पांढरे पट्टे मारण्याची मागणी



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठ्यामधील सर्व रस्त्यांवरील गतिरोधकांवर काळे पांढरे पट्टे मारण्यात यावेत, अशी मागणी भाजप भटके विमुक्त सेलच्या उत्तर रायगड महिला जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सिडकोच्या कामोठे येथील कार्यकारी अभियंता बाबूराव रामोड यांना निवेदन दिले आहे.

कामोठ्यातील गतिरोधकावर पट्टे नाहीत. त्यामुळे समोर गतिरोधक आहे हे वाहनचालकाच्या लक्षातच येत नाही, त्यामुळे छोटे मोठे अपघात होत आहेत. याचा सर्वांत जास्त त्रास हा ज्येष्ठ नागरिकांना, महिलांना आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या लहान मुलांना होतो. त्यामुळे सिडकोच्या संबंधित विभागाकडून कामोठे शहरातील गतिरोधकांवर काळे पांढरे पट्टे लवकरात लवकर मारून द्यावे, असे तामखडे यांनी म्हटले आहे.

या संदर्भातील निवेदन देतेवेळी विद्या तामखडे यांच्यासह युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भटके विमुक्त सेलचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष उत्तम जरग, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नानासाहेब मगदूम, उपाध्यक्ष उत्तम जाधव, महिला मोर्चा उपाध्यक्ष रश्मी भारद्वाज, सुनीता शर्मा, सामाजिक कार्यकर्ते वसंत गमरे, युवा नेते सुनील गोवारी, गणेश शिरीशकर आदी उपस्थित होते.

# भाजयुमोतर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा खारघर मंडलचे अध्यक्ष विनोद घरत यांच्या कार्यालयात आझाद हिंद सेनेचे संस्थापक, प्रखर राष्ट्रभक्त, नेताजी सुभाषचंद्र बोस यांना १२५व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पदाधिकाऱ्यांनी मानवंदना दिली.

या वेळी नेताजींच्या जयंतीनिमित्त भाजप राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा व भाजयुमो राष्ट्रीय अध्यक्ष तेजस्वी सूर्या यांचे मोलाचे विचार व्हिडीओ लाईव्हद्वारे युवा पदाधिकारी यांनी ऐकले. युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, युवा उपाध्यक्ष पप्पू खामकर, प्रमोद पाटील, अमोल सुतार, प्रभाग क्रमांक ३ महिला मोर्चा अध्यक्ष सरिता जाधव, जयश्री सूर्यवंशी, प्रीती दिघे, नूतन डांगळे, बबिता कसबे, सरोजिनी नायर आदी या वेळी उपस्थित होते.




### ग्रामपंचायत वडघर

**मु. वडघर, ता. पो. पनवेल, जि. रायगड**

दिनांक :- २५/०१/२०२२

ग्रामपंचायत वडघर येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १२४ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०, मधील तरतुदीनुसार गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधिन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषी आकारणीस अधिन नाहीत) यावर कर बसविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस आहे.

उक्त अधिनियमास अधिन राहून वडघर ग्रामपंचायतीने सिडको महामंडळाने विकसित केलेल्या करंजाडे नोड सेक्टर १/अे, २/अे, आर/१, आर/२, आर/३, आर/४, आर/५, मधील इमारतींना कर आकारणी करण्याच्या ठरावास मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने ग्रामपंचायतीने कर आकारणीसाठी आवश्यक असणारी प्राथमिक माहिती संकलित करण्याच्या कामास सुरूवात केलेली आहे. त्याकरीता ग्रामपंचायतीने एका खाजगी तज्ञ सेवा सल्लागार संस्थेची नेमणूक केलेली आहे.

तरी आपले इमारतीत / सोसायटीत ग्रामपंचायतीच्या वतीने आलेल्या सेवा सल्लागारांस ग्राम पंचायतीने ठरवून दिलेल्या नमुन्यातील माहिती संबंधितास देऊन ग्रामपंचायतीस सहकार्य करावे ही विनंती.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(नं. कृ. भगत)** | **(मुकेश नारायण कांबळे)** |
| ग्रामविकास अधिकारी | प्रशासक |
| ग्रामपंचायत वडघर | ग्रामपंचायत वडघर |

### ग्रामपंचायत वहाळ

**मु. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड**

दिनांक :- २५/०१/२०२२

ग्रामपंचायत वहाळ येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १२४ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०, मधील तरतुदीनुसार गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधिन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषी आकारणीस अधिन नाहीत) यावर कर बसविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस आहे.

उक्त अधिनियमास अधिन राहून वहाळ ग्रामपंचायतीने सिडको महामंडळाने विकसित केलेल्या उलवे नोड सेक्टर २, ३, ५, १९, १९/बी, २०, २१, २२, २३, २३/ई, २४, २५, २६ मधील इमारतींना कर आकारणी करण्याच्या ठरावास मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने ग्रामपंचायतीने कर आकारणीसाठी आवश्यक असणारी प्राथमिक माहिती संकलित करण्याच्या कामास सुरूवात केलेली आहे. त्याकरीता ग्रामपंचायतीने एका खाजगी तज्ञ सेवा सल्लागार संस्थेची नेमणूक केलेली आहे.

तरी आपले इमारतीत / सोसायटीत ग्रामपंचायतीच्या वतीने आलेल्या सेवा सल्लागारांस ग्राम पंचायतीने ठरवून दिलेल्या नमुन्यातील माहिती संबंधितास देऊन ग्रामपंचायतीस सहकार्य करावे ही विनंती.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(नं. कृ. भगत)** | **(पुजा समीर पाटील)** |
| ग्रामविकास अधिकारी | सरपंच |
| ग्रामपंचायत वहाळ | ग्रामपंचायत वहाळ |

### Tender Notice

**Sahyadri Apartment Owner’s Association**,
PL-6A Type, Secor-14, Khanda Colony, New Panvel (w)-410206

The tender offers are invited from the experienced / authorized agencies

1. For Consultancy Services for Conversion of Sahyadri Apt. Owner’s Association into Sahyadri Co-op. Housing Society & Allied Works.
2. For appointment of Project Management Consultants (PMC) for the redevelopment of the existing buildings (12Nos.) of Sahyadri Apt. Owner’s Association.

The Blank Tender documents are available in the office of the association or by email on payment of Rs. 5000/- for each tender on working days from 27.01.2022 to 05.02.2021 Time: from 8.30 to 12.00hrs. & 17.30 to 20.00hrs

Contact: President: 8097096285, Manager Mr. Govind : 7400367381, Email.- sahyadriaoa@gmail.com

**For Sahyadri Apartment Owner’s Association,**

| | | |
|---|---|---|
| Sd/- | Sd/- | Sd/- |
| President | Secretary | Treasurer |


## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ५

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारतात सध्या एलआसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**
***अ.)*** २४ ***ब.)*** २० ***क.)*** १० ***ड.)*** २६

**२. म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन भारतात सध्या किती कंपन्या करतात?**
***अ.)*** ४० ***ब.)*** ४४ ***क.)*** २० ***ड.)*** १०

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
***अ.)*** एचडीएफसी बँक ***ब.)*** आयसीआयसीआय बँक
***क.)*** कोटक महिंद्रा बँक ***ड.)*** स्टेट बँक ऑफ इंडिया


Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF



**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# प्रजासत्ताकाची सुखस्वप्ने

भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे असे संविधान नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या घटना समितीने रात्रंदिवस खपून भारतीय संविधान तयार केले, त्या संविधानाचा हा वाढदिवस आहे. गेल्या ७३ वर्षांमध्ये पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. स्वतंत्र भारतात अनेक सरकारे आली आणि गेली. राजकारणाचे रूपरंग बदलत गेले. समाजाचे गाडे देखील पुढेमागे होत राहिले, परंतु या देशाचे संविधान सर्वशक्तीनिशी अग्रस्थानी राहील अशी श्रद्धा असणारे सरकार भारताला लाभले ते २०१४ सालीच.

**युगानुयुगांच्या इतिहासाचा आणि संस्कृतीचा प्रचंड मोठा वारसा पाठीशी घेऊन भारताचे प्रजासत्ताक बुधवारी आपला ७३वा वाढदिवस साजरा करेल, तेव्हा स्वातंत्र्य चळवळीत ज्यांच्या पूर्वसुरींनी सहभाग घेतला त्यांना कृतकृत्य वाटेल याबद्दल शंकाच नाही. शतकानुशतके गुलामीचे साखळदंड पायात वागवल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी राजधानी दिल्लीमध्ये स्वतंत्र भारताचा तिरंगा फडकवला. आपण नियतीशी करार केल्याचे उद्‌गार त्यांनी काढले होते. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील घटना समितीने तयार केलेले भारतीय संविधान स्वीकारण्यात आले, तेव्हा तो नियतीशी झालेला करार खऱ्या अर्थाने अमलात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थ हातांमध्ये भारताची सूत्रे गेल्यानंतरच भारतीय प्रजासत्ताकाने कात टाकली असेच म्हणावे लागेल. आज बुधवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीमध्ये शानदार संचलन होईल. डोळ्यांचे पारणे फेडणारे हे संचलन म्हणजे भारताचा चालताबोलता सांस्कृतिक आणि सामाजिक वारसाच असतो. गेल्या ७३ वर्षांमध्ये अनेकविध क्षेत्रांमध्ये भारताने घेतलेली गरुडझेप या संचलनामध्ये अचूक दिसते तेव्हा उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटते. यंदा प्रथमच प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाच्या कार्यक्रमात काही बदल करण्यात आले आहेत. मुख्य बदल म्हणजे यंदाचे संचलन नेहमीप्रमाणे ठीक १० वाजता सुरू न होता, अर्धा तास उशिराने सुरू होणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या सुमुहुर्तावर राजधानी दिल्लीत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा संकल्प सोडण्यात आला. हा पुतळा उभा राहीपर्यंत ती जागा रिक्त न ठेवण्याची दक्षता देखील मोदी सरकारने घेतली. पुतळ्याच्या जागी नेताजींच्या प्रतिमेचा होलोग्राम उभा करण्याची तांत्रिक करामत करण्यात आली आहे. त्याचे जगभर कौतुक होत आहे. अर्थात या कौतुकाच्या गजरामध्ये काँग्रेसी जनांचा टीकेचा विसंवादी सूरदेखील ऐकू येत आहे. गेल्या ७३ वर्षांत बहुतेक वर्षे राजवट भोगूनही नेताजींचा पुतळा उभारावा असे काँग्रेसला कधीच सुचले नाही. किंबहुना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व लक्षात ठेवून या देशाच्या उभारणीमध्ये ज्यांनी ज्यांनी योगदान दिले, त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याची संधीदेखील काँग्रेस राजवटीने गमावली. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी असलेला हा एकेकाळचा पक्ष आता स्वत:च्याच करणीने रसातळाला गेला आहे. तरीही ते त्यातून कुठलाही धडा शिकत नाहीत हे आश्चर्यकारक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षीय राजकारण दूर ठेवून प्रजासत्ताक दिनाची आन, बान आणि शान वाढवली हे कोणालाही अमान्य करता येणार नाही. राफेल विमानापासून ते चित्ताकर्षक चित्ररथांपर्यंत आणि तालबद्ध वाद्यवृंदापासून जवानांच्या कदमतालापर्यंत प्रजासत्ताक दिनाच्या सर्वच गोष्टी प्रेरणादायी असतात. त्यातूनच प्रजासत्ताकाचे खरे सुखस्वप्न दिसू लागते.**

# पनवेलचा सांस्कृतिक वारसा 'अटल करंडक एकांकिका'



पनवेल शहराला असलेला संस्कृतिक वारसा अटल ठेवण्यासाठी आणि मराठी रंगभूमीच्या विकासासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पनवेल शाखा प्रयत्न करीत असते. त्यामुळेच पनवेलमध्ये असलेल्या क्रांतिवीर वासुदेव बाळवंत फडके नाट्यगृहातील नाटकांना पनवेलकरांचा मिळणारा प्रतिसाद नेहमीच चांगला असलेला आपल्याला पाहायला मिळतो. थिएटर ऑफ रेलेवन्सच्या माध्यमातून नाटक म्हटले की सर्व सामान्य माणसाची जी कल्पना असते ती मोडीत काढणारी व वेगळ्या धाटणीची सध्या कोणत्याही साच्यात न बसणारी, तसेच साचेबद्ध चौकटींना मोडून परिवर्तनाची दिशा अधोरेखित करणारी नाट्य अनुभूती ही पनवेलकरांनी अनुभवली आहे. पनवेलकरांच्या या नाटक प्रेमामुळेच अटल करंडक स्पर्धा किंवा हौशी मराठी नाट्य स्पर्धा असो त्यासाठी पनवेलला पहिली पसंती दिली जाते.

मल्हार करंडक म्हणून २००७ मध्ये राज्यस्तरीय स्पर्धा सुरू करण्यात आली. नाट्य चळवळ वद्धिंगत करण्यासाठी व नाट्य रसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धिंगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेच्या माध्यमातून सन २०१४ पासून या स्पर्धेचे 'अटल करंडक एकांकिका' नामकरण केले. या दर्जेदार स्पर्धेकडे अनेक नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत नेहमीच आकर्षित होताना दिसतात.

रमेश सिप्पी, प्रेमानंद गज्वी, गंगाराम गवाणकर, जयंत सावरकर, जयवंत वाडकर, केदार शिंदे, अंकुश चौधरी, आदिती सारंगधर, किरण जुनेजा, प्रदीप मुळे, राजन ताम्हणे, समीर खांडेकर, राजन भिसे, शर्वाणी पिल्ले, क्रांती रेडकर, विजय चव्हाण, विजय कदम, विजू खोटे, अविनाश खर्शीकर, संजय नार्वेकर, ऋतुजा देशमुख, मनोज जोशी अशा अनेक दिग्गज कलाकारांनी या स्पर्धेला उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे.

देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे. या स्पर्धेला मिळत असलेल्या वाढत्या प्रतिसादामुळे आणि कलाकार व रसिकांच्या मागणीमुळे ही स्पर्धा कोकण व मुंबईपुरतीच मर्यादित न ठेवता राज्यस्तरीय करण्यात आली. यंदा या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आहेत.

राज्यातील जळगाव, नागपूर, पुणे, पनवेल, रायगड या सर्व केंद्रांवर स्पर्धेच्या प्राथमिक फेऱ्या पार पडल्या असून, त्यातून अंतिम फेरीसाठी २५ एकांकिकांची निवड करण्यात आली आहे. कोरोना संदर्भातील नियमांचे पालन करून अंतिम फेरी २८, २९ आणि ३० जानेवारी २०२२ रोजी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार असल्याने पनवेलकर नाट्य रसिकांना एकांकिकांची मेजवानीच मिळणार आहे.

हो, पण कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेतलेल्या व्यक्तींनाच या वेळी नाट्यगृहात प्रवेश असणार आहे.

**खबरबात**
**नितीन देशमुख**

अभिनेता ओमकार भोजने यांनी २०१६ साली झालेल्या एकांकिका स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार पटकाविला होता आणि ते आज या स्पर्धेचे ब्रॅण्ड अँबेसिडर आहेत. या वर्षी एकांकिका स्पर्धेचे थीम साँगही तयार करण्यात आल्याची माहिती परेश ठाकूर यांनी दिली. या स्पर्धेला सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, अभिनेते व दिग्दर्शक विजय केंकरे यांची उपस्थिती लाभणार असून ज्येष्ठ दिग्दर्शक प्रकाश बुद्धिसागर यांचा 'गौरव रंगभूमीचा' या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

ही स्पर्धा पनवेलमध्ये होत आहे, हे पनवेलकरांचे सौभाग्यच असल्याचे परेश ठाकूर यांनी सांगितले. आमदार प्रशांत ठाकूर पनवेलमध्ये नाट्य चळवळ उभी करीत आहेत, त्याला या स्पर्धेमुळे चालना मिळणार असून ही स्पर्धा निरंतर सुरू राहिल्यास महापालिका आणि नाट्य परिषदेची पनवेल शाखा मदत करण्यास तत्पर राहील, असे गटनेते परेश ठाकूर सांगितले.

### अंतिम फेरीसाठी निवड झालेले संघ

*सेल नसलेला रेडिओ (नूतन मराठा कॉलेज, जळगाव), पहाटेचा मृत्यू (अंभृणी सेवा संस्था, नागपूर), सूर्याची सलामी (व्हीएमव्ही कॉलेज, नागपूर), माझी बाजू माझा पक्ष (डॉ. विठ्ठलराव खोब्रागडे शिक्षण संस्था, नागपूर), स.न.वि.वि. (देवल क्लब, कोल्हापूर), विषाद (रंगपंढरी, पुणे), आय ॲग्री टू (आमचे आम्ही पुणे), चिऊताई चिऊताई दार उघड (स्पॉट लाईट पनवेल), त्रिशंकू (कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरण), गुज (फ्रायडे, अलिबाग), पार्वती सदन- १०५ अ, ब, क (सी. के. ठाकूर महाविद्यालय, पनवेल) हायब्रीड (ॲबस्ट्रॅक्ट थिएटर, मुंबई), मानलेली गर्लफ्रेंड (इंद्रधनू, मुंबई), साबण (मृदा, कल्याण), राकस (कलासक्त, मुंबई), प्रसाद (रुईया कॉलेज, मुंबई), बेकलाइटी बेकलाइटी (मिथक, मुंबई), जनावर (प्राण, मुंबई), ए वन (माध्यम कलामंच, मुंबई), मौनांतर (नागाबादेवी कलामंच, वसई), व्हेन सुमेध मिट्स राधिका (फोर्थ वॉल, ठाणे) बिलिमारो(ढ मंडळी, कुडाळ), मनस्वीनी (निर्माती, वसई), तिडीक (प्रमुख थिएटर्स, मुंबई), लेखक (कल्लाकार्स थिएटर, ठाणे).*



# विक्रम मिनीडोअर चालक संघटनेचा पेणमध्ये एल्गार

## लेखी आश्वासनानंतर आरटीओ टाळे ठोको आंदोलन स्थगित

**पेण : प्रतिनिधी**

आपल्या प्रलंबित मागण्याची पूतर्ता करावी, या मागणीसाठी रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर चालक-मालक संघटनेने सोमवारी (दि. २४) पेण आरटीओ कार्यालयाला टाळे ठोको महसूल बंद आंदोलन केले. या वेळी परिवहन आयुक्तांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.



(छाया : अनिस मनियार)

बदली वाहन आदेशावर इड-तख इको टॅक्सी वाहनास इंधन म्हणून CNG पासिंग करावी. पेण, अलिबाग क्षेत्रातील ६+१ वाहनांना दोन वर्ष वयोमर्यादा वाढवून मिळावी. कोरोनामुळे मयत झालेल्या चालक-मालकांना परिवहन विभागाकडून मदत मिळावी. कोविड महामारीत ३+१ परवाना धारकांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मिळाले तेच अनुदान विक्रम, मिनिडोअर, मॅजिक, इको या मीटर टॅक्सी परवाना धारकांना मिळावे, कोविड काळात ज्या परवान्याची मुदत संपली आहे व वाहन पासिंग करण्याच्या योग्यतेचे नाही, असे परवाने नुतनीकरण करताना व वाहन स्क्रॅप करताना योग्यता प्रमाणपत्र व विमा प्रमाणपत्राची मागणी न करता वस्तुस्थितीचा निकष लावून परवान्याचे नुतनीकरण करावे. मीटर कॅलिब्रेशन सुविधा केंद्र पेण येथे सुरू करावे या मागण्यांकरिता सोमवारी विक्रम चालक मालक संघटनेचे अध्यक्ष विजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरटीओ कार्यालयाला टाळे ठोको महसूल बंद आंदोलन करण्यात आले. सकाळपासूनच विक्रम मिनीडोअर ईको चालक-मालक मोठ्या संख्येने आरटीओ कार्यालय बाहेर आंदोलनाकरिता जमले. त्यांनी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना कार्यालयात जाण्यापासून रोखले व आपल्या समस्या त्यांच्यासमोर मांडल्या.

पेण उपविभागीय परिवहन अधिकारी महेश देवकाते यांनी या वेळी आंदोलकांशी चर्चा केली, तसेच आंदोलकांच्या मागण्या परिवहन आयुक्तांपर्यंत पोहोचविल्या. गुरुवारी, शुक्रवारी प्रशासकीय अधिकारी व विक्रम मिनीडोअर ईको संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन योग्य तो तोडगा काढण्याचे लेखी आश्वासन परिवहन आयुक्तांनी या वेळी दिले. त्यानंतर विजय पाटील यांनी आंदोलन तूर्त स्थगित झाल्याची घोषणा केली.

या आंदोलनात संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद पाटील, खजिनदार सचिन पाटील, सचिव विकास पारंदे, राजीव भंडारी, राकेश राखाडे, सुधाकर यादव, शंकर पाटील, किशोर पाटील, दीपक म्हात्रे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य सहभागी झाले होते.


## आरोग्य प्रहर

# हिरवे टोमॅटो खाण्याचे आहेत बरेच फायदे

लाल टोमॅटोचा वापर आपण नेहमीच वेगवेगळ्या भाज्यांमध्ये करतो किंवा तसेही जेवताना खातो. लाल टोमॅटोचे आरोग्याला होणारे वेगवेगळे फायदेही तुम्हाला माहीत असतील, पण हिरव्या टोमॅटोच्या आरोग्याला होणाऱ्या फायद्यांबाबत क्वचितच कुणाला माहीत असेल.

एक्सपर्टनुसार, हिरव्या टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, फायबर, फोलेट, कॅल्शिअम, पोटॅशिअमसारखे पोषक तत्व आढळून येतात. जर तुम्ही यांचा डाएटमध्ये समावेश कराल तर तुम्हाला यातील अँटी इंफ्लामेट्री गुणांचाही फायदा मिळतो. हिरवे टोमॅटो खाल्ल्याने इम्युनिटी मजबूत होते, तसेच त्वचेसाठीही हिरवे टोमॅटो खाणे फायदेशीर असतात.

टोमॅटो ही अशी भाजी आहे जी कोणत्याही पदार्थाची चव वाढवते, त्याचप्रमाणे ते सलाड म्हणूनही खाल्ले जाते. टोमॅटोची चटणी, सूप किंवा ज्यूस या नावाचा समावेश असलेल्या इतर अनेक प्रकारे लोक याचा वापर करतात. बहुतेक लोक लाल टोमॅटोला त्यांच्या आहाराचा भाग बनवतात, परंतु असे म्हटले जाते की हिरव्या टोमॅटोचे आरोग्य फायदेदेखील भरपूर पोषक असतात. डॉक्टर आणि तज्ज्ञदेखील त्याच्या फायद्यांबाबत सांगतात. तसे, हिरव्या टोमॅटोचे इतर अनेक फायदे आहेत, जे तुम्हालादेखील माहीत असले पाहिजेत.



डोळ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे बीटा कॅरोटीन हिरव्या टोमॅटोमध्ये मोठ्या प्रमाणात आढळते. बीटा कॅरोटीनने डोळे निरोगी ठेवण्यासोबतच तुम्हाला दिसते त्याच्यातही सुधारणा होते. खराब जीवनशैलीमुळे, आजकाल बहुतेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या आहे. यासाठी ते विविध औषधांचा आधार घेतात, परंतु ही औषधेही अनेक प्रकारे आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. अशा परिस्थितीत हिरव्या टोमॅटोने तुम्ही रक्तदाब नियंत्रित करू शकता. वास्तविक, त्यात आढळणाऱ्या पोटॅशियमने रक्तदाब नियंत्रित केला जाऊ शकतो.

प्रदूषणामुळे त्वचेवर मुरूम आणि काळे डाग येण्याची समस्या सामान्य झाली आहे. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी लोक विविध रासायनिक उत्पादनांचा वापर करतात, परंतु जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही त्याऐवजी घरगुती उपायांची मदत घेऊ शकता. घरगुती उपायांमध्ये हिरव्या टोमॅटोचाही समावेश आहे. त्वचेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे व्हिटॅमिन सी यामध्ये भरपूर प्रमाणात असते, तसेच त्यातील अँटिऑक्सिडंट्स त्वचा निरोगी ठेवण्यासाठी प्रभावी मानले जातात.



# भाजपच्या भटके-विमुक्त सेलचा उत्तर रायगड जिल्हा दौरा उत्साहात

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

भाजप भटके-विमुक्त मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी पक्षवाढीसाठी आपल्या सहकाऱ्यांसोबत उत्तर रायगड जिल्हा दौरा केला. या दौऱ्यात खोपोली येथील पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला व येणाऱ्या काळामध्ये संघटन वाढीसाठी कसे काम करावे याचे मार्गदर्शन केले.

खोपोली मंडळाचे अध्यक्ष संतोष लोहार यांचा अपघात झाला असल्याने त्यांच्या घरी जाऊन बबन बारगजे यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला भेट दिली. त्यानंतर कर्जत तालुक्यातील वेणगाव येथील भटके-विमुक्त समाजातील कार्यकर्त्यांच्या घरी सदिच्छा भेटी दिल्या व तेथील समस्या जाणून घेतल्या. संघटन वाढविण्याच्या दृष्टिकोनातून बांधवांसोबत चर्चा केल्या. त्यानंतर कडाव येथील सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गंगावणे यांच्या घरी सदिच्छा भेट दिली व विविध विषयांवर चर्चा केली.

या दौऱ्यात बबन बारगजे यांच्यासह भाजप भटके-विमुक्त सेलच्या महिला प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाणे, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षा विद्या तामखडे, रायगड जिल्हा सहसंयोजक उत्तम जरग, महिला मोर्चाच्या सहसंयोजिका नीता मंजुळे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत मंजुळे आदी उपस्थित होते. खोपोली येथे मंडल अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल व सरचिटणीस हेमंत नांदे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. वेणगाव येथे मंडल अध्यक्ष मंगेश साळुंखे यांच्या घरी भेट दिली. या वेळी जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, नगरसेवक बळवंत घुमरे आदी उपस्थित होते.

# माणगावमध्ये कॉपर कॉईल चोरी

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील विळे-भागाड एमआयडीसीतील महावितरणच्या ट्रान्स्फार्मरमधील कॉपर कॉईल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विळे-भागाड एमआयडीसीमधील ए ६५ प्लॉटजवळ महावितरणचा ट्रान्स्फार्मर (क्र. ४८०५६७६) आहे. त्यातील सुमारे १७० किलो वजनाची कॉपर कॉईल अज्ञात चोरट्याने १७ नोव्हेंबर ते २७ डिसेंबर २०२१ या काळात चोरून नेली. याबाबत आकाश राजकुमार पूर्वे (वय ३६, रा. माणगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक श्री. बेग करीत आहेत.

# कशेळेजवळ दुचाकीला अपघात; दोन जखमी

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कोठिंबे-कशेळे रस्त्यावर रविवारी (दि. २३) दुचाकीला अपघात झाला. त्यात दोन प्रवासी जखमी झाले असून, त्यांच्यावर मुंबई अंधेरी येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कर्जत तालुक्यातील पोखरकरवाडी गावाच्या हद्दीतील यशराज गोट फार्ममध्ये काम करणारे प्रदीप तुलसी दोडीया आणि विकास विजय जायस्वाल हे दोघे जण सुझुकी स्कुटी (एमएच ०२, एफएच ५६५८) घेऊन रविवारी दुपारी कशेळे येथे भोजन करण्यासाठी गेले होते. कोठिंबे-कशेळे रोडवर त्यांच्या दुचाकीच्या पाठीमागील चाकाची हवा गेल्याने स्कुटी स्लिप होवून रस्त्याच्या डाव्या बाजूला पडली.

या अपघातात दुचाकीवरील प्रदीप दोडीया (वय ३६, रा. जोगेश्वरी मुंबई) आणि विकास जायस्वाल (वय ३२, रा. ठाणे) जखमी झाले.

त्यांच्यावर कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना मुंबईत हलविण्यात आले. या अपघाताची नोंद कर्जत पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास हवालदार वडते करीत आहेत.

# मच्छीमारांना उद्ध्वस्त करण्याचा राज्य सरकारचा घाट : आमदार महेश बालदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने पर्ससीन मच्छीमारसोबत सर्वच मच्छीमारांना उद्ध्वस्त करण्याचा घाट घातला आहे. अस्मानी संकटापेक्षा सुलतानी पेशाचा त्रास या मच्छीमार बांधवांना सहन करावा लागत आहे, अशी टीका आमदार महेश बालदी यांनी केली.



शासनाने पर्ससीन मच्छीमारीवर बंदी घातल्याने मच्छीमार आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाच्या या जाचक धोरणाविरोधात रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पर्ससीन मच्छीमार बांधवांनी २० जानेवारीपासूम बेमुदत साखळी उपोषण सुरू केले होते. मंगळवारी (दि. २५) आमदार महेश बालदी यांनी उपोषणकर्ते मच्छीमारांची भेट घेतली. मच्छीमारांच्या या लढ्यात भाजप तुमच्यासोबत असून याबाबत केंद्रात आवाज उठवणार, असे आश्वासन आमदार बालदी यांनी या वेळी मच्छीमारांना दिले. त्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

पारंपरिक मच्छीमार जगला पाहिजे तसा आधुनिक काळातील पर्ससीन मासेमारी करणारा मच्छीमारही जगला पाहिजे. जुन्या पद्धतीने व्हलव्याने मच्छीमार होडी चालवून मासेमारी करीत होता, अजून त्याने तसेच राहावे का, असा प्रश्नही आमदार बालदी यांनी उपस्थित केला आहे.

मच्छीमार हा बारा वावच्या बाहेर जाऊन मासेमारी करीत असेल तर राज्य शासनानेही याबाबत सकरात्मक राहिले पाहिजे. मात्र जाचक अटी लावून मच्छीमाराला उद्ध्वस्त करण्याचा घाट राज्य शासनाने घातला आहे, हे आम्ही खपवून घेणार नाही. आम्ही मच्छीमार बांधवांच्या सोबत आहोत, असेही आमदार महेश बालदी या वेळी म्हणाले.

## पेणमध्ये दुचाकीची महिलेला धडक

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील बालाजी कॉम्प्लेक्स समोरील रस्ता ओलांडणार्‍या पादचारी महिलेस सोमवारी (दि. २४) दुपारी भरधाव जाणार्‍या दुचाकीने धडक दिली. या अपघातात माधुरी म्हात्रे या गंभीर जखमी झाल्या.

फिर्यादी माधुरी यशवंत म्हात्रे (वय ४६, रा. वाशी ता. पेण) या सोमवारी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास पेण शहरातील बालाजी कॉम्पलेक्स समोरील रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी आरोपी (रा. रामवाडी, ता. पेण) याने त्याच्या ताब्यातील बजाज मोटारसायकल (नंबर प्लेट नसलेली) अतिवेगाने चालवून पादचारी माधुरी म्हात्रे यांना धडक दिली. या अपघातात माधुरी म्हात्रे यांचा उजवा हात मोडला असून अनेक ठिकाणी दुखापत झाली आहे.

# केंद्राकडून ‘पद्म’ पुरस्कारांची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस म्हणजेच मंगळवारी (दि. २५) २०२२ वर्षाच्या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. एकूण १२८ जणांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**यामध्ये महाराष्ट्रातील प्रभा अत्रे (कला : पद्मविभूषण), नटराजन चंद्रशेखरन (व्यापार आणि उद्योग) आणि सायरस पुनावाला (व्यापार आणि उद्योग) यांना पद्मभूषण, तर डॉ. हिंमतराव बावस्कर (वैद्यकीय), सुलोचना चव्हाण (कला); विजयकुमार डोंगरे आणि बालाजी तांबे (मरणोत्तर) यांना पद्मश्री पुरस्कार देण्यात आले.**

त्या व्यतिरिक्त डॉ. बिपीन रावत (मरणोत्तर), कल्याण सिंह (मरणोत्तर) आणि राधेशाम खेमका (मरणोत्तर), सोनू निगम, अनिल राजवंशी, भिमसेन सिंगल यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत.

### महाडच्या डॉ. बावस्करांना पद्मश्री

*रायगड जिल्ह्यातील महाडमधील डॉ. हिंमतराव बावस्कर (वैद्यकीय) यांना भारत सरकारने पद्मश्रीने सन्मानित केले आहे. त्यांनी विंचू दंशावरील लस शोधून काढली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकर्‍यांना विंचू दंशापासून दिलासा देण्याचे काम डॉ. बावस्कर यांनी केले आहे.*



*भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी या पुरस्काराबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, वैद्यकीय क्षेत्रातील चुकीच्या प्रथांना त्यांनी कायम विरोध केला आणि या चुकीच्या प्रथांबद्दल जागरुकता निर्माण करणारा डॉक्टर म्हणून समाजामध्ये त्यांचा नावलौकीक आहे. महाड तालुक्यातील खेड्यापाड्यातील सर्वसामान्य माणसाच्या मनात त्यांच्याबद्दल आदर आहे. डॉ. बावस्करांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्वसामान्य माणसांना आनंद झाला आहे. या सर्व पुरस्कारांच्या माध्यमातून प्रतिभावंतांना सन्मान मिळाला पाहिजे, मात्र वशिलेबाजांना नाही, हे या पुरस्कारांने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मोदी सरकारच्या या यादीचे हे यश आहे, असेच म्हणावे लागेल.*

# जीवन घडविण्यासाठीही आपल्या मतांचा कौल घ्या –नितीन पाटील

## ■ कर्जत, रोहा, नेरळ येथे राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजावलाच पाहिजे. प्रलोभनांना न भुलता योग्य उमेदवाराला मतदान केल्यास चांगला लोकप्रतिनिधी निवडून येऊन त्याच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा व्यक्त करता येते. त्याचप्रमाणे काय योग्य? काय अयोग्य? हे ठरवून आपले मत आपल्यालाच देऊन योग्य निर्णय घ्या. तुम्हाला आयुष्यात कधीही अपयश येणार नाही, असा सल्ला ‘उत्तुंग भरारी’ चे नितीन पाटील यांनी मंगळवारी (दि. २५) विद्यार्थ्यांना दिला.



कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये राष्ट्रीय मतदार दिनाचे आयोजन करण्यात आले होते. नितीन पाटील यांनी क्लिक करून समारंभाचे उद्घाटन केले.

प्रलोभनांना बळी पडून मतदान केल्यास आपल्या लोकप्रतिनिधींवर आपला हक्क रहात नाही. आपला गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देश चांगल्याप्रकारे घडवायचा असेल तर मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे, असे प्रतिपादन महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी केले.

प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी प्रास्ताविकात मतदानाचे महत्त्व पटवून दिले. मतदानाच्या दिवशी फिरायला न जाता मतदानाचा हक्क प्रथम बजवा. तरच आपली लोकशाही सक्षम होईल, असे डॉ. एम. एस. घाडगे सांगितले. यानंतर ‘मतदान करूच शिवाय कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता तसेच एकदम निरपेक्ष बुद्धीने आपला मतदानाचा हक्क बजावू.’ ही सामुदायिक शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनिषा चौधरी यांनी केले. डॉ. भरत टेकाडे, प्रा. निलोफर खान, प्रा. शिल्पा गजबे, प्रा. तनिष्का ठाकरे, रेवती देशपांडे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. प्रा. अमोल टेकाडे यांनी आभार मानले.

**कर्जत : बातमीदार**

नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामण टिपणीस महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, अजीवन अध्ययन आणि विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २५) राष्ट्रीय मतदार जागृती दिन साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात नवमतदार नोंदणीचा संकल्प करण्यात आला, तसेच प्रा. सोनम गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मतदार जागृतीविषयक शपथ दिली. डॉ. स्नेहल देशमुख यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अनंत घरत यांनी मार्गदर्शन केले. प्रा. अमोल सोनावणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय मतदार जागृती दिनानिमित्त ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत ऋतिक विरले याने प्रथम, सागर सकपाळे याने द्वितीय आणि ईशा जानवलकर हिने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. संतोष तुरुकमाने आणि प्रा. वैभव बोराडे यांनी केले. प्रा. सागर मोहिते, प्रा. दुराज टिवाळे, प्रा. धनंजय कोटांगळे, ग्रंथपाल जागृती घारे, आरती आवटे, नरेंद्र देशमुख आदींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. प्रा. विकास घारे यांनी आभार मानले.

**रोहे : प्रतिनिधी**

योग्य वाटणार्‍या प्रतिनिधीला निवडण्याचा आपल्याला घटनात्मक अधिकार आहे, तो आपण न चुकता बजावला पाहिजे, असे प्रतिपादन रोहे येथील डॉ. चिंतामणराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी येथे केले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कोकण एज्युकेशन सोसायटीच्या रोहे येथील डॉ. चिंतामणराव देशमुख महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. अतुल साळुंके मार्गदर्शन करीत होते. मतदाराने निःसंकोचपणे, निर्भीडपणे व कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपण आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन त्यांनी केले.

(छाया : महादेव सरसंबे)



प्रा. तुळशीदास मोकल यांनी प्रास्ताविकात राष्ट्रीय मतदार दिनाविषयी माहिती दिली. त्यानंतर त्यांनी उपस्थिताना मतदान जागृती संदर्भातील शपथ दिली.

मतदार दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयात मतदार जनजागृती विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत समीर गजानन शिंदे याने प्रथम, तर अनिशा प्रमोद शिंदे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. या दोन्ही विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत थोरात यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. सीमा भोसले, प्रा. सुकुमार पाटील, प्रा. शत्रुघ्न लोहकरे, डॉ. अनिल शिंदे, डॉ. कमलाकर कांबळे आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विध्यार्थ्यांनी मेहनत घेतली.



